<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-** **दिनांक १३/०२/२०१५.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>फेब्रुवारी महिन्याची दुसरी सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१.** इतिवृत्त कायम करणे.
**२.** प्रश्नोत्तरे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**३.** ऐरोली सेक्टर १५, भुखंड क्र. २२ए दिवागांव या जागेवर "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर" स्मारकाचे बांधकाम करणे.

**४.** भुखंड क्र. ७१,७२,७३ से. ११ सी.बी.डी. बेलापूर येथील पार्किग व कॅफेटेरीया मधील किऑक्स(Koisk) ०५ वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देणे.

**५.** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुकाने गाळे/कार्यालये ०५ वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देणे.

**<u>ठरावाची सूचना :</u>**

**६. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**
मालमत्ता कर व स्थानिक संस्था कराची (LBT) थकीत वसूली सुलभ व्हावी तसेच आर्थिक मंदित असलेल्या रहिवाशी, व्यापारी तसेच उद्योजक वर्गावर आर्थिक बोजा कमी व्हावा अशा रहिवाशी, व्यापारी तसेच उद्योजक वर्गाची कर निर्धारणा झाली असेल व व्याज तसेच दंडाची रक्कम बाकी असेल किंवा जे मुळ रक्कमेचा भरणा करतील किंवा मुळ रक्कम भरणा केली असेल त्याच्या निर्धारणा आदेशात लावण्यात आलेल्या व्याज व दंडात १०० % सवलत देणारी अभय योजना अंमलात आणावी.

**७ ते ९. श्री. संदिप बाळकृष्ण सुतार, यांजकडून:-**
**(७)** प्र. क्र. ७९, सेक्टर-२५ येथील मुख्य नाला (अरुण हॉटेल ते एसटीपी प्लॉन्ट) चे कॉक्रिटीकरण करणे. **(८)** आयुक्त निवासाच्या लागून असलेली उच्च स्तरीय पाण्याच्या टाकी सभोवताली संरक्षक भिंत बांधणे. **(९)** एअर इंडिया कॉलनी कंपाऊन्ड लगत सिग्नल लवळून ते सेक्टर-२७ An Hill View प्लॉन्ट नं. ६९/७० पर्यत नवीन रस्ता बनविणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १३ फेब्रुवारी २०१५.**